# प्रेस नोट

आदेश क्र. पोउआ/वाहतुक/ ४४९३/२०१७ पुणे शहर दिनांक - ०१ / ११ /२०१७

पुणे शहरात जुना पुणे-मुंबई महामार्ग अभियांत्रिकी उड्डाण पुलाचे आर.टी.ओ. कडील अप्रोच पासुन उड्डाणपुलास जोडणा-या भागाचे काम मुख्य अभियंता (प्रकल्प) कार्यालय पुणे महानगरपालिका तर्फे करण्यात येणार आहे. महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र.एम.व्हि.ए.०१९६/८७१/सी.आर/३७/टीआरए-२, दिनांक - २७/९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(ए)(बी), ११६(४), ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी अशोक मोराळे, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पुणे शहर खालील प्रमाणे दि. ०२/११/२०१७ पासुन काम संपेपर्यंत तात्पुरते आदेश निर्गमित करत आहे.

१. इंजिनीअरींग चौकाकडून आरटीओ कडे जाणारा रस्ता सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद करण्यात येत आहे.
२. मुंबई कडून आरटीओ चौकाकडे जाणा-या वाहणांनी इंजिनिअरींग चौकातील ब्रीज वरती चढून संचेती चौक येथून डावीकडे वळून कोर्टाचे समोरुन कामगार पुतळा शाहीर अमर शेख चौकातून डावीकडे वळून आरटीओ चौकाकडे जावे.
३. सिमला ऑफिस चौकाडून इंजिनिअरींग चौक मार्गे आरटीओ चौकाकडे जाणा-या वाहणांनी संचेती अंडरपास मधुन कामगार पुतळा,शाहीर अमर शेख चौकातुन डावीकडे वळून आरटीओ चौकाकडे जावे.
४. सदरचा आदेश दि. ०२/११/२०१७ पासून पुलाचे काम पुर्ण होईपर्यंत लागु राहील.